VOL- XI ISSUE- V MAY 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

# नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षक शिक्षण

**उज्वला सीताराम डामसे**
शिक्षणशास्त्र संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**गिनगीने कावेरी विश्वनाथ**
शिक्षणशास्त्र संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

***सारांश :***

*34 वर्षानंतर नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण NEP- 2020 29 जुलै 2020 या दिवशी मंजूर करण्यात आले. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय आता 'शिक्षण मंत्रालय' या नावाने ओळखले जाईल व या नामांतरणांबरोबरच अनेक आमुलाग्र बदल या NEP- 2020 मध्ये करण्यात येतील. 1947 मध्ये भारतीय स्वतंत्र झाल्यानंतर निरक्षरता दूर करण्यासाठी सातत्याने 'साक्षरता अभियान' सारखे अनेक कार्यक्रम आखले गेले. त्यामध्ये सुरुवातीला शिक्षण आयोग (1949) नेमण्यात आले व पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1968 मध्ये स्वीकारण्यात आले. भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांनी देशभरातील निरक्षरता दूर करण्यासाठी समान 'शैक्षणिक पद्धत' प्रस्थापित करून विविध शिक्षण आयोग प्रस्तावित केले. त्यामध्ये प्रामुख्याने डॉक्टर राधाकृष्णन आयोग, मुदलियार आयोग व कोठारी आयोग हे प्रस्तावित होतेत्यानुसार भारतातील आयोगांची मांडणी . केल्याप्रमाणे निरक्षरता दूर करण्याचे क्रांतिकार कार्य स्वातंत्र्यानंतरही काही वर्षे सुरूच राहिले. दुसरे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 मध्ये लागू करून त्यामध्ये 1992 ला काही प्रमाणात बदल करण्यात आला. 2009 मध्ये आरटीई ऍक्ट (RTE Act) संमत करून मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कलम '21 A' हे नुसार वयोगट सहा ते 14 मधील विद्यार्थी बालकांना प्राप्त झाला सर्वप्रथम . 31 ऑक्टोबर २०१५ रोजी T.S.R. सुब्रमण्यम यांची पाच सदस्य समिती गठित करून यांच्या अध्यक्षतेखाली नवीन शैक्षणिक धोरणाची निर्मिती केली. या समितीने 27 मे 2016 रोजी अहवाल सादर केला व इस्रोचे शास्त्रज्ञ यांच्या अध्यक्षतेखाली 24 जून 2017 रोजी नऊ सदस्य समिती स्थापन केली. नवीन शैक्षणिक धोरणाच्या मसुदा स्थापन करण्याचे काम या समितीकडे होते. समर्थ, सशक्त शैक्षणिक व्यवस्था उभारणे हे या धोरणाचे मुख्य उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. त्यानुसार विविध शिक्षणतज्ञ, माजी शिक्षणमंत्री व इतर अनेक क्षेत्रातील प्रख्यात व्यक्तीकडून यासाठी सूचना मागविण्यात आल्या होत्या व भरभरून प्रतिसाद देखील देण्यात आला होता व त्यांचा विचार विमर्श करून नवीन शैक्षणिक धोरणाची निर्मिती केली.*

*महत्त्वाचे शब्द: शैक्षणिक धोरण, शिक्षक शिक्षण, शाश्वत विकास*

**प्रस्तावना:**

भारताला जागतिक स्तरावर सुपर पॉवर बनवणे हा मुख्य उद्देश ठेवून नवीन शैक्षणिक धोरणाची निर्मिती करण्यात आली आहे. यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण क्षमता शोधणे, क्षमता शोधून विकसित करण्यासाठी प्रयत्न करणे, शिक्षक आणि पालकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांचे सर्वांगीण विकासासाठी अभ्यास व अभ्यासे तर या दोन्ही क्षेत्रांमध्ये चालना देणे यांचा समावेश यामध्ये करण्यात आला आहे. विज्ञान, कला, समाजशास्त्र, मानसशास्त्र आणि खेळ यांच्यामध्ये बहुशाखि य आणि समग्र शिक्षणाचा विकास करून घोकंपट्टी करण्याऐवजी त्या संकल्पना समजून घेण्यावर भर देण्यात आला आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून सर्जनशील विचार, चिकित्सक विचार, संभाषण कला, सहकार्य, सहवेदना व आत्मविश्वास ही कौशल्य विशेषत्वाने विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या व अभ्यासक्रमांच्या माध्यमातून शिकवले जाणार आहे. या धोरणामध्ये जागतिक शिक्षण विकास कृती कार्यक्रम समाविष्ट असून सर्वांसाठी सर्व समावेशक, सर्वांसाठी निरंतर अध्ययनाच्या शिक्षणाच्या संदर्भात प्रोत्साहन देण्याची 2030 पर्यंत उद्दिष्ट ठेवण्यात आलेली आहे. दहा + दोन शैक्षणिक संरचना ऐवजी पाच + तीन + तीन + चार ही आकृतीबंध स्वीकारण्यात आलेला आहे. संवाद, सहकार्य, सामूहिक कार्य आणि लवचिकता अशा जीवन मूल्याची तरतूद करण्यात आलेली आहे. सातत्यपूर्ण मूल्यांकन यावर भर देऊन अध्ययन व

अध्यापनात तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करण्यात येणार आहे. नवीन शैक्षणिक धोरण यामध्ये शिक्षक आणि प्राध्यापक हे शिक्षण प्रक्रियेचे केंद्र म्हणून त्यांची भरती आणि तयारीची उत्कृष्ट व्यवस्था सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास आणि कामकाजाचे वातावरण व सेवेची स्थिती सकारात्मक ठेवण्याचा मानस यामध्ये मांडण्यात आलेला आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विकासासाठी सहा आवश्यकता म्हणून उत्कृष्ट दर्जाचे संशोधन करण्यात येईल व शिक्षण तज्ञाद्वारे सातत्यपूर्ण संशोधन आणि नियमित मुलांकनाद्वारे प्रगतीचा सातत्यपूर्ण आढावा घेण्यात येईल. अध्यापन हा नैतिकदृष्ट्या व बौद्धिकदृष्ट्या अतिशय आव्हानात्मक व्यवसाय आहे. नवीन शिक्षकांना प्रचंड मेहनत घेऊन कसून पूर्वतयारी करावी लागते आणि शिक्षकी पेशामध्ये असलेल्या व्यक्तींना निरंतर व्यावसायिक विकास आणि शैक्षणिक व व्यावसायिक सहाय्य गरजेचे आहे. शिक्षकांच्या तयारीसाठी चार वर्षाच्या एक विकसित केलेल्या बॅचलर ऑफ एज्युकेशन कार्यक्रम बहुशाखीय संस्थांमध्ये पदवीपूर्व अभ्यासक्रमाद्वारे प्रदान करण्यात येईल. सतत अभ्यासक्रमामध्ये शैक्षणिक विषय व शिक्षक तयारी अभ्यास या दोघांचा समावेश असेल. स्तरनिहाय व विषयनिहाय असलेला हा अभ्यासक्रम शालेय पूर्व असून ते माध्यमिक स्तर या इयत्तासाठी आवश्यक असलेल्या कला व क्रीडा यांच्यासह सर्व विषयांसाठी शिक्षकांची पूर्वतयारी करून घेईल. व्यावसायिक शिक्षण किंवा विशेष शिक्षण यांचाही या अभ्यासक्रमात समावेश असेल. सन 2030 नंतर कोणत्याही प्रकारची पूर्व सेवा शिक्षक तयारी अभ्यासक्रम प्रधान करण्यात येणार नाही. शिक्षक शिक्षण केवळ भविष्यातील शासकीय संस्थांमध्येच प्रदान करण्यात येईल. शैक्षणिक दृष्टिकोनविषय व अध्यापनशास्त्र यांच्या सखोल आकलण्यासाठी तसेच सिद्धांतिक अज्ञान व प्रत्यक्ष ज्ञान यांच्यातील परस्पर वेळ दूर होण्यासाठी विविध विषयांमधील उत्तम प्रतीच्या पूर्व सेवा शिक्षक तयारीला नैतन्याची गरज असते. याकरिता शिक्षणाच्या मुख्य क्षेत्रामध्ये व इतर सर्व शैक्षणिक विषयांमध्ये विविध तऱ्हेचे विशेषज्ञ उपलब्ध असणे व एकमेकांशी जोडलेल्या शाळा उपलब्ध असणे ही काळाची गरज आहे. दुय्यम दर्जाच्या कार्यरत नसलेल्या व मोडकळीस आलेल्या शिक्षक शिक्षण संस्था बंद करण्यात येतील व शिक्षक शिक्षणाचा अभ्यासक्रम लवचिक करण्यात येईल. त्यासाठी पुढील काळात फक्त शिक्षकी पेशातील व्यक्तीच फक्त शिक्षक होतील हे वाक्य किंवा ही परिस्थितीला बाजूला सारली जाईल कारण यानंतर पुढील कालावधीमध्ये NEP- 2020 मध्ये इंजिनियर, नर्स, डॉक्टर किंवा इतर क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती हे शिक्षकी पेशी मध्ये येऊ शकतात परंतु त्यांच्यामध्ये तशा प्रकारची कौशल्य असणे गरजेचे आहे त्यासाठी फक्त शिक्षक होण्यासाठी यांतील किंवा इतर अजून प्रकारचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदानच महत्त्वाचे असणार आहे अशी बाब ही यामध्ये अधिकृत नाही.

भारताच्या भवितव्यासाठी शिक्षकांच्या सक्षमीकरणावर NEP 2020 भर देते. शिक्षकांशिवाय भारतीय मूल्य, भाषा, ज्ञानाची आचारसंहिता आणि परंपरा यांचा आधार घेतला पाहिजे आणि त्याचवेळी शिक्षण आणि अध्यापन शास्त्रातील प्रगती पारंगत असणे आवश्यक आहे. अधिक विचार प्रक्रियांना चालना देण्याचा, विकसित करण्याचा, समस्या सोडवणे, वेळ व्यवस्थापन, कौशल्य विकसित करण्याचा आणि मुलांना सर्जनशील व नाविन्यपूर्ण होण्यासाठी सक्षम करण्याचा इतर महत्त्वाच्या कौशल्यांचा विकास करण्याचा प्रयत्न या नवीन शैक्षणिक धोरणाच्या परस्पर संबंधित संसाधने वापरण्याचा प्रयत्न केला गेला आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून शिक्षणाच्या विविध संधी निर्माण होऊन कौशल्य व व्यावहारिक शिक्षणाला प्राधान्य देण्यात येईल व या शैक्षणिक धोरणामुळे देशात मोठ्या प्रमाणात कुशल मनुष्यबळ निर्माण होऊन स्वयंरोजगार युवापुढी तयार होण्याचे संकेत आहे. त्या शैक्षणिक धोरणामुळे शिक्षणातील रचनात्मक बदल, अभ्यासक्रमातील सूत्रता, अध्यापनाच्या अभिनव पद्धती, मूल्यमापनातील सुधारणा मात्रभाषेतून शिक्षणाच्या संधी, नवीन अभ्यासक्रमातील एक समान अभ्यास पद्धती अशा विविध गुणांचा अंगीकार नवीन शिक्षण व्यवस्था निर्माण करेल.

NEP- 2020 मध्ये शिक्षकाची भूमिका बदललेली पाहायला मिळणार आहे कारण टेपरेकॉर्डर सारखी काहीतरी वाचले शिकवले व अभ्यासक्रम पूर्ण केले आणि वर्षाच्या शेवटी परीक्षा घेतली व त्याचा निकाल लावून विद्यार्थ्यांना पदवी किंवा शिक्षण दिले म्हणजे शिक्षकांचे काम संपले किंवा पूर्ण झाले असे होऊ शकत नाही. तर विद्यार्थ्यांना माणूस म्हणून घडविताना शिक्षकांचे महत्त्वाची भूमिका असणार

आहे. शिक्षक विद्यार्थ्यांचे जीवन बदलवितात, स्वप्नांना प्रेरणा देतात आणि मानवी क्षमतेच्या मर्यादा पलीकडे विद्यार्थ्यांसाठी जीवन घडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न हे शिक्षक या येणाऱ्या नवीन शैक्षणिक धोरणामध्ये सांभाळणार आहेत. शिक्षक म्हणजे विद्यार्थ्यांचे दुसरे पालकच. जे विद्यार्थ्यांना त्यांचे जीवन संतुलित करण्यास आणि भविष्याचा शोध घेऊन जीवनाची चांगली जडणघडण करण्याची मदत करतात. विद्यार्थ्यांच्या फक्त शैक्षणिक विकासावरच नव्हे तर त्यांची वैयक्तिक वाढ आणि चारित्र्य निर्मिती करण्याचे महत्त्वाची भूमिका बजावतात. विद्यार्थ्यांना ज्ञान, क्षमता किंवा मूल्ये प्राप्त करण्यास मदत करतात. बालपणापासून ते पदवीपर्यंत अनेक शिक्षक शिकवून जातात पण विद्यार्थ्यांचे लक्षात हे फक्त कायमचे असे शिक्षक असतात की जे शिक्षक प्रेमळ आणि मैत्रीपूर्ण असतात जे प्रेरणा देतात आणि विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करतात. NEP- 2020 मध्ये शिक्षकांची भूमिका ही अतिशय मोलाची असणार आहे व फक्त अध्यापनाचे कार्य करून पुरेसे होणार नाही तर विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये वैयक्तिकरित्या वाटा घेणे गरजेचे असणार त्यामुळे शिक्षकांना त्यांचे ज्ञान सतत अद्यावत ठेवणे गरजेचे आहे व सतत काहीतरी शिकत राहणे महत्त्वाचे असतात.

**समारोप :**

2020 मध्ये शिक्षकांसाठी शिक्षणाची तरतूद करण्यात आलेली आहे. शिक्षक हा नेहमी नवीन ज्ञान देण्याची गरज यामध्ये अपेक्षित आहे. नियोजन, व्यवस्थापन, सकारात्मक दृष्टिकोन व इतर महत्त्वाच्या बाबी या शिक्षकांच्या वर्तणुकीमधून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामध्ये फक्त वर्गखोल्यामध्ये असतानाच संभाषण होईल असे अपेक्षित न करता क्रीडांगण, मैदान, ग्रंथालय, प्रयोगशाळा, व्यायामशाळा व इतर वैयक्तिक ठिकाणी यांचा संबंधित प्रत्येक ठिकाणी ज्ञानाची कौशल्याची व शिक्षण समितीची स्थापना होणे अपेक्षित आहे. एकंदरीत विद्यार्थी व शिक्षक यांच्यात खेळण्याचे व मैत्रीचे नाते निर्माण करून सतत ज्ञानगंगा वाहती ठेवणे हे नवीन शैक्षणिक धोरणामध्ये अपेक्षित आहे. त्यासाठी येणाऱ्या कालावधीमध्ये नवीन शैक्षणिक धोरणाची निर्मिती केल्यानंतर शिक्षकावर खूप मोठ्या अपेक्षा ठेवण्यात आलेले आहेत कारण शिक्षकच हा उद्याच्या सुजाण नागरिक घडू शकतो पूर्वीच्या शैक्षणिक धोरणामध्ये भारताचे भवितव्य हे वर्गखोल्यांमधून घडताना दिसत आहे असे उल्लेख करण्यात आले होते परंतु आता शिक्षकांच्या हातून उद्याचा सुजाण नागरिक घडताना आपण या शैक्षणिक धोरणामध्ये पाहणार आहोत.

**संदर्भ ग्रंथसूची :**

1. Decoding National Educatio Policy 2020, Datta G Sawant, Xpress PublishingAn Imprint of Notion Press India. Singapore. Malaysia. First Published by Notion Press, April 2024 Copyright © Editor,
2. Kasturirangan, K., Sridhar, M. K., & Srivastava, M. (2020). National Education Policy 2020: Vision and Action. Ministry of Human Resource Development, Government of India.
3. Ministry of Education, Government of India. (2020). National Education Policy 2020. Available at: https://www.education.gov.in/en/nep2020.
4. National Education Policy 2020: Road Map for Education in India rajesh s gore, Xpress PublishingAn Imprint of Notion Press India.
5. www.eduvarta.com
6. www.nep2020.in.